क्र.साप्रवि/रवका/न.क्र.३४८/३०८६६
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

दिनांक : १२ / १० / २०११

# परिपत्रक

विषय : नागरिक केंद्रित योजनांसाठी ओळखीचे प्रमाणपत्र आणि रहिवासाचा दाखला म्हणून आधार कार्ड ग्राह्य धरण्याबाबत.

संदर्भ : मुख्य सचिव, माहिती तंत्रज्ञान संचालनालय यांचे पत्र क्र.मातंस-२०११/४१६१/ प्र.क्र.१९९/ ३९ दि.०५ सप्टेंबर २०११.

......

कक्ष अधिकारी, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे संदर्भिय पत्रासोबत मुख्य सचिव, माहिती तंत्रज्ञान संचालनालय यांचे पत्र क्र.मातंस-२०११/४१६१/ प्र.क्र.१९९/ ३९ दि.०५ सप्टेंबर २०११ तसेच अतिरीक्त सचिव, संचार आणि माहिती तंत्रज्ञान, भारत सरकार यांच्या अर्धशासकीय पत्र क्र. २ (३२)/ २००५-इजीडी, दिनांक १२.०८.२०११ ची प्रत प्राप्त झाली आहे.

२. त्यानुसार नागरीभूत सेवा पुरविण्याकरिता आधार क्रमांकाचा वापर करणे गरजेचे असून नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवा, त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना आणि कार्यक्रम यांचा लाभ घेण्याकरिता तसेच ओळखीचा दाखला व रहिवासाचा दाखला म्हणून आधार कार्डावरील आधार क्रमांक ग्राह्य धरण्याच्या केंद्र शासनाच्या सूचना अतिरीक्त सचिव, संचालक आणि माहिती तंत्रज्ञान, भारत सरकार यांच्या दिनांक १२.०८.२०११ च्या पत्रान्वये दिल्या आहेत. सदर पत्राची प्रत तसेच उपरोक्त महाराष्ट्र शासन यांचे दि.०५ सप्टेंबर २०११ च्या शासनाच्या पत्राची प्रत सोबत जोडली असून त्यातील सूचना सर्व कर्मचारी/अधिकारी यांच्या निदर्शनास आणाव्या.

३. सदर परिपत्रक कंपनीच्या इंट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले आहे.

सहपत्र : वरीलप्रमाणे.

*(विजय भि. बागुल)*
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

*D:\O&M\Circular-F.N.348.doc*
*07/10/2011*

क्रमांक - संकीर्ण - २०११ / प्र.क्र. २३५ / प्रशासन-२

11

**महाराष्ट्र शासन**

तात्काळ

क्रमांक :मातंस २०११/४१६१/प्र.क्र.१९९ /३९
माहिती तंत्रज्ञान संचालनालय,
७ वा मजला, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२
दिनांक : ५ सप्टेंबर, २०११

प्रति,

अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
सर्व मंत्रालयीन विभाग

**विषय :- नागरिक केंद्रित योजनांसाठी आधार कार्ड ओळखीचे प्रमाणपत्र आणि रहिवासाचा दाखला म्हणून ग्राहय धरण्याबाबत**

**महोदय / महोदया,**

महाराष्ट्रात आधार प्रकल्प राबविला जात आहे. आतापर्यन्त आधार क्रमांकासाठी दोन कोटी व्यक्तींची नोंदणी करण्यात आलेली आहे.

२. राज्यातील वंचित घटकातील बहुसंख्य लोकांकडे त्यांची ओळख पटविण्यासाठी कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे नसतात. त्यामुळे त्यांच्यासाठी शासनाकडून राबविण्यात येणा-या योजना, प्रकल्प, कार्यक्रम इत्यादीचा लाभ त्यांना घेता येत नाही. अशा वंचित घटकातील लोकांसाठी आधार कार्ड ही त्यांची स्पष्ट ओळख आहे.

३. राज्यात आधार नोंदणीची प्रक्रिया समाधानकारक आहे. आता नागरीभूत सेवा पुरविण्याकरिता आधार क्रमांकाचा वापर करणे गरजेचे आहे. त्यासाठी नागरिकांना देण्यात येणा-या सेवा, त्यांच्यासाठी राबविण्यात येणा-या विविध योजना आणि कार्यक्रम यांचा लाभ घेण्याकरिता नागरिकांना दिलेले आधार कार्ड ओळखीचा दाखला तसेच रहिवासाचा दाखला म्हणून ग्राहय धरण्याच्या केंद्र शासनाच्या सूचना आहेत या सूचना आपल्या नियंत्रणाखालील सर्व कार्यालय / स्वायत्त संस्था / मंडळे / महामंडळे यांना देण्यात याव्यात.

प्रशा-2 ने पाठवावे

प्रशा-2

प्रधान सचिव (उद्योग)
क्र. ........
दि. २५/०९/११
3663/Gen

आपला

( रत्नाकर गायकवाड )
मुख्य सचिव

सोबत: अतिरिक्त सचिव, संचार आणि माहिती तंत्रज्ञान भारत सरकार यांच्या दि. १२.८.२०११ ची प्रत.

I

SHANKAR AGGARWAL, IAS
Additional Secretary
Tel. No: 24363114
Fax No: 24363119
E-mail: s.a@nic.in

सत्यमेव जयते

भारत सरकार
GOVERNMENT OF INDIA
संचार और सूचना प्रौद्योगिकी मंत्रालय
MINISTRY OF COMMUNICATIONS AND INFORMATION TECHNOLOGY
सूचना प्रौद्योगिकी विभाग
DEPARTMENT OF INFORMATION TECHNOLOGY
इलेक्ट्रॉनिक्स निकेतन
ELECTRONICS NIKETAN
6, सी.जी.ओ. कॉम्पलेक्स/6, C.G.O. COMPLEX
नई दिल्ली/New Delhi-110003

दूरभाष/Tele :

अ०स० पत्र सं० :

D.O. No........2(32)/2005-EGD

दिनांक/Dated............................
12th August, 2011

Dear Sir,

This has reference to the instructions contained in the D.O. letter No. 281/1/5/2011-TS dated 25th April 2011 from Cabinet Secretary regarding issue of instructions for recognizing Aadhaar number as Proof of Identity (PoI) and Proof of Address (PoA) for various resident-centric schemes under this Ministry.

2. As you are aware, the Unique Identification Scheme is a Government of India initiative for providing identity to all residents in India. The Unique Identification Authority of India (UIDAI) is entrusted with the responsibility of issuing UID (Aadhaar) numbers and, among others, to define usage and applicability of the Aadhaar numbers for delivery of various resident-centric services.

3. UIDAI has commenced issue of Aadhaar numbers. Following the interaction meeting held with UIDAI and in pursuance of the decision taken in the meeting of the Committee of Secretaries (CoS) held on 21.12.2010, Ministries/ Departments have initiated action to integrate Aadhaar numbers with Central Government Schemes/ Programmes. Director General & Mission Director, UIDAI has informed that integration of various Central Government Schemes/Programmes with Aadhaar, to serve as a platform for service delivery, may take some time. However, in the interregnum, Aadhaar can be treated as a valid PoI and PoA for various resident-centric schemes.

4 In this regard, you are requested to issue instructions to recognize Aadhaar as a valid PoI and PoA for all resident-centric schemes, programmes and services within your Department/ Organization.

regards,

Yours sincerely

(Shankar Aggarwal)

Heads of all DIT Agencies and IT Secretaries of all States.

सर्व शिक्षा अभियान
सब पढ़ें सब बढ़ें

सचिव (मो.सं.)
रा. प. नि.
UID